असा. क्र. ९३

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

सोमवार, नोव्हेंबर ३, २००३/कार्तिक १२, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ नोव्हेंबर २००३

**अधिसूचना**

**भारतीय वन अधिनियम, १९२७.**

क्रमांक एसडब्ल्यूएन. १०९३/सीआर ३३१/फ-६.—भारतीय वन अधिनियम, १९२७ महाराष्ट्र राज्याला लागू असताना त्याच्या कलम ४१ आणि कलम ७६ च्या खंड (घ) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे मुंबई वन नियम, १९४२ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना मुंबई वन (सुधारणा) नियम, २००३ असे म्हणावे.

२. मुंबई वन नियम, १९४२ यांच्या नियम ८८ मध्ये पोट-नियम (१०) ऐवजी पुढील पोट-नियम बदली दाखल करण्यात येईल :—

"(१०) या नियमाच्या पोट-नियम (११) अन्वये राज्य शासनाकडून देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशासह या नियमामध्ये अंतर्भूत केलेली कोणतीही गोष्ट सर्वसाधारण घरगुती सुतार कामाला किंवा अल्प प्रमाणावरील तशाच प्रकारच्या अन्य कामाला लागू होणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या नियमांच्या प्रयोजनांसाठी " अल्प प्रमाणावरील तशास प्रकारची अन्य कामे " या शब्दप्रयोगाचा अर्थ जे लाकडाचे प्राथमिक उपभोक्ते नाहीत आणि जे प्राथमिक स्वरूपात करवतीने कापण्याच्या कामासाठी कोणतेही नवीन लाकूड वापरत नाहीत, परंतु, अशा सुतारकामांच्या प्रयोजनासाठी १२ इंच किंवा त्यापेक्षा कमी व्यासाच्या गोल करवतीचा वापर करून कुटीर उद्योगाच्या किंवा लघु उद्योगाच्या स्वरूपात सुरू केलेल्या व्यवसायात खेळणी, फोटोफ्रेम, पेट्या, इत्यादीसारख्या लहान लाकडी वस्तू बनविण्यासाठी केवळ सुतार कामांची करवतीने पुन्हा कापण्याची कामे हाती घेतात, अशी सुतारकाम युनिटे असा होतो आणि त्यात त्यांचा समावेश होतो, परंतु त्यांमध्ये एक लघु उद्योग म्हणून वाणिज्यिक तत्त्वावर सुरू केलेल्या आरा गिरणींच्या कामात गुंतलेल्या इतर लघु उद्योग युनिटांचा समावेश होणार नाही.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. ना. त्रिपाठी,**
शासनाचे उप सचिव.



## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 3rd November 2003

*NOTIFICATION*

INDIAN FOREST ACT, 1927.

No. SWM. 1093/CR. 331/F-6.—In exercise of the powers conferred by section 41 and clause (*d*) of section 76 of the Indian Forest Act, 1927, in its application to the State of Maharashtra and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby make the following rules further to amend the Bombay Forest Rules, 1942, namely :—

1. These rules may be called the Bombay Forest (Amendment) Rules, 2003.

2. In rule 88 of the Bombay Forest Rules, 1942, for sub-rule (10), the following sub-rule shall be substituted, namely :—

"(10) Nothing contained in this rule, including any directions issued by the State Government under sub-rule (11) of this rule, shall apply to the ordinary operation of domestic carpentry or to the other similar work on a small scale.

*Explanation.*—For the purposes of this rule, the expression "other similar works on a small-scale" shall mean and include carpentry units which are not primary consumers of wood and which do not consume any fresh material for primary sawing but undertake only re-sawing operations of carpentry works for making small wooden articles such as toys, photo-frames, boxex, etc. taken up as vocation in the form of cottage industry or a small-scale industry, using a circular saw of diameter 12" or below for the purpose of such carpentry works, but shall not include other small-scale units involved in saw mill operations taken up on commercial basis as a small-scale industry.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. N. TRIPATHI,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई